ठाणे, बुधवार दि. १० जुलै २०२४ | वर्ष : १३, अंक : ७३ , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे | संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**मोदीशाहीचा एककल्ली कारभार**

लोकसभा निवडणुक झाल्यानंतर निकाल भाजपच्या बाजुने लागला आणि एनडीएचे सरकार केंद्रात सत्तेवर आले आहे. या लोकसभा निवडणुकीत अनेक क्लृप्त्या लढवत भाजपाने केंद्रात सत्ता प्राप्त केली...... पान २ वर



**गौतम गंभीरची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड**

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुम्ही अशा पक्षात जाणार आहात, जरी तुम्ही कोट्यवधींचा घोटाळा केला असला तरी तो माफ होईल.

■ वरळी हिट अँण्ड रन प्रकरणातील

# मुख्य आरोपी मिहिर शाहाला पोलिसांनी केली अटक

**मुंबई – वरळी हिट अँड रन अपघात प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला शहापूरमधून अटक करण्यात आलं आहे. या प्रकरणात मिहीर शाहाची आई आणि बहिणीलाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तसेच या आरोपीला मदत करणाऱ्या १२ जणांनाही मुंबईच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतलं आहे.**

मिहीर शाहाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने गाडी चालवून वरळीमधील ॲट्रिया मॉलजवळ कावेरी नाखवा या महिलेचा जीव घेतला होता. (पान २ वर)



**12 जण मदत करणारे ताब्यात**



**मिहीरला पळून जाण्याचा सल्ला**

या प्रकरणात राजेश शाह यांनी अपघात झालेल्या गाडीवरील पक्षाचा झेंडा आणि नंबरप्लेट बदलण्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं. तसेच ही गाडी मुख्य पुरावा असून ती अज्ञात स्थळी लपवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचसोबत मिहीर शाहाने अपघात झाल्याची माहिती राजेश शाहांना फोनवरून दिल्यानंतर 'तू पळून जा, अपघात ड्रायव्हरने केल्याचं आपण सांगू' असा सल्ला दिल्याचंही पोलीस तपासातून समोर आलं आहे. वरळी अपघातावरून राजकारण चांगलंच तापलं असून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना या विषयावरून धारेवर धरलं आहे. मिहीर शाहाचे वडील राजेश शाह हे शिवसेना शिंदे गटाचे पालघरचे उपनेते आहेत. त्यामुळे सत्ताधारी हे आरोपीला पाठीशी घालत असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे.


## माझी आई मला परत करा, ती कधी येईल?; लेंकीची आर्त हाक



वरळी हिट अँड रन अपघात प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला शहापूरमधून अटक करण्यात आलं आहे. तसेच या प्रकरणातील संबंधित मदत करणारे १२ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, पीडित नाखवा कुटुंबीयांवर कोसळलेल्या दु:खाची भरपाई कशानेही होणार नाही. नुकतेच, अपघातामधील मृत कावेरी नाखवा यांच्या मुलीचा हृदयस्पर्शी व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओत ती मुलगी स्वत:चे अश्रू रोखू शकत नसल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे माझ्या आईला मी रडलेलं आवडणार नाही, असे म्हणत ती धाय मोकलून रडताना दिसत आहे. तसेच, माझी आई मला परत करा, अशी आर्त हाक तिने दिल्याचं दिसून येत आहे.

# अखेर त्या १४ गावांचा नवी मुंबई पालिकेत समावेश

**कल्याण : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील १४ गावांचा गेल्या कित्येक वर्षांपासून संघर्ष सुरू होता. अखेर या गावांचा नवी मुंबई पालिकेत समावेश करण्यात आला आहे. गाव विकास समिती आणि मनसे आमदार राजू पाटील यांच्या प्रयत्नांना यश आले असून नवीमुंबई पालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.**



**गाव विकास समिती आणि मनसे आमदार राजू पाटील यांच्या प्रयत्नांना यश**

कल्याण ग्रामीण भागात असलेल्या १४ गावांचा नवी मुंबई प्रवेशासाठी संघर्ष सुरु होता. सलग सहा वेळा लागलेल्या पाच ग्रामपंचायतींच्या निवडणुकांवर विकास समितीने बहिष्कार टाकून आपली एकजूट दाखवली होती. सतत ग्रामपंचायत निवडणुकांवर बहिष्कार टाकून शासनाला निर्णय घेण्यास समितीकडून भाग पाडण्यात आलं होतं. १४ गावांचा नवी मुंबई प्रवेशाचा प्रश्न मनसे आमदार राजू पाटील यांनी अधिवेशनात उपस्थित केला होता. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी १४ गावं नवी मुंबई मनपात समाविष्ट करण्याची घोषणा देखील केली होती. मात्र गावं समाविष्ट करण्यासाठी शासनाने अधिसूचना काढली नसल्याने गाव विकास समिती आणि मनसेचे आमदार राजू पाटील त्याबाबत पाठपुरावा देखील करत होते. अखेर मनसे आमदार राजू पाटील यांच्या मागणीला यश आले असून कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील '१४ गावांचा' नवी मुंबई पालिकेत समावेश करण्यात आला आहे. नवी मुंबई पालिकेचे (पान २ वर)

# मुंबईतील रेल्वे स्थानकांचे नावे बदलण्याचा ठराव विधिमंडळात मंजूर

मुंबई – विधानसभा निवडणूकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी मतदारांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारकडून विविध योजना जाहिर करण्याची घाई करण्यात येत आहे. विधिमंडळाच्या सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी लाडकी बहीण योजना जाहिर करण्यात आली. त्याच धर्तीवर आता मराठी भाषेच्या मुद्यांवरून पुन्हा एकदा मराठी मतदारांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारने मुंबईतील रेल्वे स्थानकांना इंग्रज काळातील नावे काढून मराठी नावे देण्याचे नवे कार्ड आज वापरत राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी मुंबईतील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा ठराव विधानसभा आणि विधान परिषदेत मांडला. त्यास विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने पारीत करण्यात आला. या ठरावाला सत्ताधारी आणि विरोधी बाकावरील महाविकास आघाडील सदस्यांनी एकमतांने मंजूरी दिली. (पान २ वर)

**कोणत्या स्थानकाचे नाव बदलले**

- करी रोड – लालबाग
- असँडहर्स्ट रोड – डोंगरी रेल्वे स्थानक,
- मरीन लाईन्स – मुंबादेवी,
- चर्नी रोड – गिरगाव,
- कॉटन ग्रीन – काळाचौकी,
- डॉकयार्ड रोड – माझगाव रेल्वे स्थानक,
- किंग सर्कल – तीर्थकर पार्श्वनाथ रेल्वे स्थानक

■ **मुंबई सेंट्रलला नाना शंकर शेठ याचं नाव कधी ?**

■ **अरविंद सावंत यांनी केली होती मागणी**

**थोडक्यात घडामोडी**

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज करणेबाबत अवाहन

ठाणे – महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील ६५ वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरीकांना त्यांच्य दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा, यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करण्याकरिता मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेबाबत अधिक माहिती व योजनेचे अर्ज प्राप्त करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे, ४ था मजला, सामाजिक न्याय भवन, दत्तवाडी, स्वामी समर्थ मठासमोर, कळवा, ठाणे ४००६०५ या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

# पाण्यासाठी केडीएमसीच्या प्रभाग कार्यालयावर शिवसेनेचा हंडा मोर्चा

**कल्याण : पावसाळा सुरु झाल्यानंतर देखील अनेक भागात अजूनही पाणी टंचाईची समस्या कायम आहे. हीच परिस्थिती कल्याणजवळील अटाळी, वडवली, मोहने, आंबिवली परिसरात निर्माण झाली आहे. पाण्याची समस्या सुटत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली असून आज शिवसेनेने आज आंदोलन छेडले. थेट केडीएमसीच्या प्रभाग कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्यात आला.**

कल्याणजवळील अटाळी, वडवली, मोहने, आंबिवली एनआरसी कॉलनी परिसरात आजही भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. या भागातील नागरिक गेल्या वर्षभरापासून पाणी टंचाईने त्रस्त असून अनेकदा याबाबत निवेदन देऊन पाण्यासाठी आंदोलन केली आहेत. मात्र त्यानंतर देखील पाण्याची समस्या सुटली नाही. या भागातील महिला नागरिकांना (पान २ वर)



# बनावट सीमद्वारे शिवीगाळ करून धमकावणाऱ्या टेली कॉल सेंटरचा पर्दाफाश





ठाणे – दुसऱ्याच्या नावाच्या सिमकार्डचा वापर करून लोन घेतलेल्या थकबाकीदारांना त्याचे नातेवाईक आणि आजूबाजूच्या लोकांना नाहक त्रास देवुन त्यांना शिवीगाळ तसेच अश्लील भाषेत बोलणा-या टेली कॉल सेटरचा पर्दाफाश करण्यात आला. (पान २ वर)

■ **कॉल सेंटरचे साहित्य जप्त.. तिघांना अटक... १० जुलै पर्यंत पोलीस कोठडी...**

### ठाणे पोलिसांचे नागरिकांना आवाहन

लोन रिकव्हरी टेली कॉल सेंटर मधील इसम हे पुरूष व महीलांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळी अथवा अश्लील भाषेत बोलुन त्रास देत असतील त्यांनी संबंधीत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी असे आवाहन ठाणे पोलिसाद्वारे ठाणेकरांना करण्यात आले.

# येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात १० नवीन मेडिकल कॉलेज



मुंबई- दरवर्षी वैद्यकीय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची चढाओढ पाहायला मिळते. कॉलेजेसची असलेली कमी संख्या आणि तुलनेत वैद्यकीयसाठी इच्छुक विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या यामुळे मोठी तारांबळ उडते. पण आता अत्यंत महत्वाची अपडेट समोर आली आहे. राज्यात नवे मेडिकल कॉलेज येणार आहेत.

राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे शासनाचे प्रयत्न असून मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेने ५० एम.बी.बी.एस. विद्यार्थी क्षमतेने परवानगी दिलेली आहे. उर्वरीत ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अर्ज राष्ट्रीय वैद्यक परिषदेमार्फत दर्शविण्यात आलेल्या त्रुटी पुर्ण करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी सांगितले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता जिल्हा गडचिरोली, जालना, वाशिम, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, नाशिक, भंडारा, अंबरनाथ (जिल्हा ठाणे) आणि मुंबई (१० संस्था) येथे १०० एम.बी.बी.एस. विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आले होते, अशी माहिती मंत्री मुश्रीफ यांनी दिली.

### कंत्राटी, मानधनावर पदे भरणार

त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही शासन आणि संचालनालय स्तरावर सुरु आहे. अध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सुरु असून वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत आणि संलग्नीत रुग्णालय या संदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तसेच काही अध्यापकांची पदे कंत्राटी, मानधनावर भरण्यात येणार असल्याच मुश्रीफ यांनी सांगितले.

### त्रुटी पूर्ततेसंदर्भातील हमीपत्र

त्रुटी दर्शविलेल्या प्रस्तावित ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांचेकडे शासनामार्फत अपील दाखल करण्यात येणार आहे.या अपिलाच्या सुनावणीस शासनाकडून त्रुटी पूर्तते संदर्भातील हमीपत्र सादर करुन या महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने योग्य ते प्रयत्न करण्यात येत आहेत.

### शासनस्तरावरुन प्रयत्न सुरु

सध्या नीट-युजी-२०२४ ची परीक्षा पुढे गेली असल्यामुळे ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करुन घेऊन या शैक्षणिक वर्षी एम.बी.बी.एस. प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न सुरु आहेत, अशी माहिती मंत्री मुश्रीफ यांनी दिली आहे

# सर्व प्रभारी पदावरील अधिकाऱ्यांना मूळ पदावर आणा

■ **अतिरिक्त वेतनाची वसुली करा**

■ **महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनची मागणी**

ठाणे – ठाणे महानगर पालिकेत सध्या सर्वच विभागांमध्ये प्रभारी अधिकाऱ्यांची चलती निर्माण झाली आहे. लिपीकांना थेट सहाय्यक आयुक्त ते उपायुक्तपदाचा प्रभारी पदभार सोपविण्यात आला आहे. त्यातून ठाणे महानगर पालिकेचे नुकसानच होत आहे. त्यामुळे सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना मूळ पदावर आणून त्यांच्याकडून अतिरिक्त वेतनाची रक्कम वसूल करावी, अशी मागणी महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी केली आहे. या मागणीसाठी ते स्वातंत्र्य दिनी उपोषणाला बसणार आहेत. महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी या संदर्भात ठामपा आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनामध्ये दादोजी कोंडदेव स्टेडियमचे उदाहरण दिले असून या ठिकाणी नियुक्त असलेल्या अधिकारी लिपीक या संवर्गातील आहेत. मात्र, राजकीय वरदहस्त असल्याने त्यांना ही बढती दिली आहे, असा आरोप केला आहे.

ठामपातील अनेक अधिकारी हे लिपीक असून त्यांना सहाय्यक आयुक्त तसेच प्रभारी उपायुक्तपदाचा पदभार देण्यात आला आहे. त्यातून ठाणे महानगर पालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय, स्पर्धा परीक्षा न देता हे अधिकारी मोक्याच्या जागांवर बसलेले असल्याने धोरणात्मक निर्णय घेणे त्यांना शक्य होत नाही. (पान २ वर)

# भिवंडीत पिसाळलेल्या कुत्र्याचा हैदोस

**शाळकरी मुलांसह ५०-५५ जणांना चावा**

**भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरातील गौसिया मस्जिद परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने हैदोस घातला असून सोमवारी सायंकाळी शाळा सुटल्यानंतर घरी जाणार्या मुलांवर भटक्या कुत्र्याने हल्ला चढवला. ५० ते ५५ जणांना चावा घेतला आहे. त्यामध्ये १८ शाळकरी विद्यार्थ्यांचा मुलांचा समावेश आहे. पिसाळलेल्या कुत्र्याने गेल्या तीन दिवसात या परिसरात अनेक नागरिकांना चावा घेतला. सोमवारी या कुत्र्याने अक्षरश: हैदोस घातला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. कुत्र्याने चावा घेतलेल्या मुलांना आणि नागरिकांना इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात उपचार करता दाखल करण्यात आलं आहे. यापैकी दोन विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक आहे.**

### एका महिन्यात ८८६ जणांचा चावा घेतला

जून महिन्यात तब्बल ८८६ जणांना श्वान दंश झाल्याची माहिती स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिक्षिका डॉ. माधवी पंधारे यांनी दिली आहे. ७ जुलै रोजी कामतघर परिसरात ६० श्वान दंश झाले होते तर शांतीनगर भागात ८ जुलै रोजी ४५ जणांना श्वान दंश झाले. या व्यतिरिक्त इतर भागातसुद्धा श्वान दंशाच्या घटना घडल्या असून या दोन दिवसात एकूण १३५ रुग्णांना रेबीज प्रतिबंधक पहिला डोस देण्यात आला आहे. रुग्णालयात रेबीज डोसचा साठा उपलब्ध आहे अशी माहिती अधीक्षिका डॉ. माधवी पंधारे यांनी दिली आहे.



### कारणं काय आहेत?

भारतात भटके कुत्रे सर्वाधिक असण्याचं मुख्य कारण म्हणजे भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्याची घोषणा करण्यात आली, पण ही योजना प्रभावीपणे राबण्यात राज्य सरकारं कमी पडतायत. याशिवाय भारतात प्राण्यांच्या आरोग्यसेवा आणि नियंत्रणासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा नाही आहे.

### निर्बिजीकरण केंद्र वर्षभरापासून बंद

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचा निर्बिजीकरण मागील कित्येक वर्षांपासून बंद आहे. महापालिका आयुक्त अजय वैद्य यांनी २०२३ पासून शहरातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी दोन वेळा निविदा प्रक्रिया राबविली. परंतु संस्थांकडून प्रतिसाद आला नाही. दरम्यान, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाली होती. ८ जुलै रोजी या बाबतच्या फाईल्सवर स्वाक्षरी करून संबंधित विभागाला तातडीने निविदा प्रक्रिया राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. येत्या आठ दिवसांमध्ये भिवंडी शहरातील भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरण करण्यासाठी यंत्रणा सज्ज करणार असल्याची माहिती पालिका आयुक्त तथा प्रशासक अजय वैद्य यांनी दिली आहे.

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक महाराष्ट्र सम्राट



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## मोदीशाहीचा एककल्ली कारभार

लोकसभा निवडणुक झाल्यानंतर निकाल भाजपच्या बाजुने लागला आणि एनडीएचे सरकार केंद्रात सत्तेवर आले आहे. या लोकसभा निवडणुकीत अनेक क्लृप्त्या लढवत भाजपाने केंद्रात सत्ता प्राप्त केली. भाजपाने लोकसभा निवडणुकीत मोदींसह बड्या नेत्यांच्या सभा आयोजित केल्या होत्या. प्रत्येक सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे इंडिया आघाडी व काँग्रेस वर टीका करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनतेला अनेक आश्वासने देतात, परंतु त्यांनी गेल्या दहा वर्षांत किती आश्वासने पाळली हा चर्चेचा विषय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचार सभेत काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका कएली होती. परंतु स्वतः दिलेल्या आश्वासनांबद्दल ते काहीच बोलत नसल्याचे दिसून येते. फक्त भाजपाला मत द्या, आम्ही अल्पसंख्यांक विरोधात आरक्षणाची भूमिका घेणार नाही असे महणत होते. परंतु दुसऱ्या बाजूला त्यांनी असे म्हटले की, मी धर्माच्या आधारे कोणत्याही समाजाला आरक्षण देणार नाही. याचा अर्थ असा होतो की, कोणत्याही जातीच्या आधारे आरक्षण द्यायला भाजपचा विरोध आहे. नरेंद्र मोदी यांनी देशात गेल्या दहा वर्षांत जे वातावरण पसरवले आहे, त्याचा परिणाम इतका गंभीर आहे की अनेक प्रादेशिक पक्ष फुटले आहेत, नेते सैरभर झाले आहेत. अशा परिस्थितीत सत्ताधारी राजकीय पक्ष भाजपा समाजकारण कसे करणार हा प्रश्न निर्माण होत आहे. गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रामध्ये अस्वस्थता पसरलेली दिसून येते. याचे कारण म्हणजे दोन प्रादेशिक पक्षांमधील नेत्यांनी बंडखोरी करून त्या पक्षावर ताबा मिळवला आहे. याला कारण महाराष्ट्रातील भाजपा हेच आहे. महाराष्ट्रामध्ये अस्वस्थता निर्माण करून भाजपाला काही साध्य करायचे आहे, हे नरेंद्र मोदीच जाणोत. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांमध्ये विरोधकांवर राष्ट्रीय तपास यंत्रणांची कारवाई सुरू केली आहे. तसेच अनेक राजकीय पक्षांमध्ये ढवळाढवळ केले आहे. त्यामुळे एकूणच महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पूर्णपणे बदललेले दिसते. अशा परिस्थितीत ज्या जनतेने नेत्यांना निवडून दिले, तेच नेते तडजोडी करून संकुचित विचारांच्या राजकीय पक्षांशी संधान साधत असल्याचे दिसते. त्यामुळे जनतेच्या मतांना कोणी जुमानत नसल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत जनतेच्या मताला काहीच किंमत राहिलेली नाही. अशा परिस्थितीत लोकसभा निवडणूक झाली. तडजोडी करीत भाजपाने सत्ता आली, पण मतदार नाराज आहेत. लोकसभा निवडणुकीत निवडणुकीत मतांची टक्केवारी २०१९च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा १० ते ११ टक्क्यांनी कमी झाली. त्यामुळे मतदार लोकसभा निवडणूक २०२४ साठी उत्सुक नसलेला दिसतो. जेव्हा मतदार कमी संख्येने मतदान करतो त्यावेळेस मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होतो. कमी टक्क्यांमध्ये निवडून आलेला उमेदवार ग्राह्य कसा धरायचा हा प्रश्न येतो. भारत निवडणूक आयोगाने मतदारांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले. परंतु मतदार मत देण्यासाठी राजी दिसले नाहीत. त्यामुळे लोकशाहीच्या संकेतांचा भंग झाला असल्याचे दिसते. या घटनेमागे अनेक कारणे आहेत. एक तर राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी मतदारांना दिलेल्या आश्वासनांचा भंग केला आहे. किंवा मतदारांना राजकीय पक्षांच्या तडजोडी मान्य नसल्याचे दिसते. कारण मतदारच या निवडणुकीत गोंधळलेला दिसतो आणि ही परिस्थिती केंद्रातील भाजपने लोकांवर लादलेली दिसते.केंद्र सरकारने गुजरातमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तत्कालीन मुख्यमंत्री असताना ज्या आरोपींनी एका अल्पसंख्याक महिलेवर अत्याचार, बलात्कार केला होता, त्याच आरोपींना विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इशाऱ्यावर सोडण्यात आले होते. त्यामुळे हे आरोपी तुरुंगाबाहेर येतात, त्यांचे सत्कार समारंभ करण्यात होतात, ही परिस्थिती नक्कीच सकारात्मक नाही. आणि या घटनेचे परिणाम खुद्द गुजरातमध्ये होणार असल्याचे दिसते. कारण गंभीर आरोपी असलेल्या लोकांचे सत्कार करणे ही बाब भवितव्यात भाजपाला महाग पडू शकते. त्यामुळे बेटी बचाव बेटी पढाव या अभियानाचे नेमके काय झाले, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट करण्याची गरज आहे. अल्पसंख्यांकावर अत्याचाराने करणे ही भाजपाची संस्कृती आहे काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. तसेच देशांमध्ये विरोधकांवर राष्ट्रीय तपास यंत्रणांची कारवाई होत असल्याचे दिसते. ही कारवाई करून काही विरोधकांना केंद्र सरकारने तुरुंगात टाकले आहे. उदाहरणार्थ, दिल्लीतील आम आदमी पक्ष पक्षाचे प्रमुख नेते अरविंद केजरीवाल यांना केंद्र सरकारने राष्ट्रीय तपास यंत्रणेची कारवाई करत तुरुंगात ठेवले. त्यामुळे दिल्लीतील जनमत भाजपाविरोधात होते. तरीही आप प्रमुखांच्या अनुपस्थित भाजपाने दिल्लीतील ८ जागा जिंकल्या हे विशेष आहे. विरोधी राजकीय पक्षांना तपास यंत्रणांची भीती घालत आपल्या बाजूला वळवणे ही भाजपाची खेळी आहे. या खेळीला अनेक नेते बळी पडले आहेत. काही नेते खासगीमध्ये असे मान्य करत आहेत की, आमच्यावर केंद्रातून दबाव आला होता. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला आहे. परंतु ज्यांच्यावर दबाव आला ते नेते जनतेला कसे सुखी ठेवतील हा एक प्रश्न आहे. परंतु भारतात गेल्या दहा वर्षांत जे काही सुरू झाले आहे ते आश्चर्यकारक आहे असे दिसते. देशातील विरोधकांनी काही महिन्यांपासून ईव्हीएमच्या विरोधात आवाज उठवला होता, तो आवाजही केंद्र सरकारने दाबून टाकला. त्यामुळे केंद्र सरकारची देशात हुकूमशाही सुरू आहे याला पुष्टी मिळते. अशा परिस्थितीत जनता नेमके कुणाला मतदान करणार हे पहावे लागणार आहे.देशात महागाई, बेरोजगारी आणि गरिबी दिवसेंदिवस वाढत आहे. याचे कारण म्हणजे केंद्रातील भाजपाचा उलटा कारभार होय. कारण केंद्र सरकारने देशात रस्ते, मंदिर आणि काँग्रेसच्या जुन्या योजना नव्याने केल्या. परंतु केंद्र सरकारकडे सर्वसामान्यांचा विकास करणारी कोणतीही योजना दिसत नाही. त्यामुळे देशातील अनेक नागरिक व सुशिक्षित बेरोजगार यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. देशातील बेरोजगारी व महागाई आटोक्यात येण्याची चिन्हे नाहीत. परंतु केंद्र सरकार जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर त्यांनी असे जाहीर केले होते की, भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर होऊ शकते. परंतु भारत भारताची अर्थव्यवस्था सद्यस्थितीत तीन ट्रिलियन डॉलरही नाही असे दिसते. मग नेमका विकास कोणाचा झाला हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपण दिलेल्या आश्वासनांचे आत्मचिंतन करण्याची गरज आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सभेत बोलताना नेहमी म्हणतात की, मोदी सरकारने जनतेचा विकास केला. तसेच अनेक जाहिरातीमध्ये असे दिसते की, मोदी सरकारने हे केले, मोदी सरकारने ते केले. त्यामुळे केंद्र सरकारला मोदी सरकार हे नाव हेतू पुरस्सर देण्यात आले आहे. यावरून भाजपाचा एककल्ली व हुकूमशाहीचा स्वभाव दिसून येतो. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. परंतु जनतेला ते विकासाचा मार्ग केव्हा दाखवणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे असे वाटते.

## मुंबईतील रेल्वे स्थानकांचे नावे बदलण्याचा ठराव विधिमंडळात मंजूर

**(पान १ वरून) मुंबई सेंट्रलला नाना शंकर शेठ याचं नाव कधी ?** – मुंबई सेंट्रस स्थानकाला मुंबईचे शिल्पकार समाजसेवक नाना शंकर शेठ असे नाव देण्यात यावे अशी मागणी नामदार जगन्नाथ ( शंकर ) शेठ प्रतिष्ठान गेली कित्येक वर्षे करीत आहे. परंतू या स्थानकाचे नाव बदलण्यात आले नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. नाना शंकर शेठ यांना आशियातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ साली मुंबईच्या बोरीबंदर ते ठाणे या मार्गावर धावली होती. या जीआपीआर रेल्वे कंपनीचे कार्यालयच नाना शंकर शेठ यांच्या घरात उघडण्यात आले होते. व्हीक्टोरीया टर्मिनस या स्थानकाला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असे नाव देण्याची मागणी ९० च्या दशकात काँग्रेसने केली होती.

**अरविंद सावंत यांनी केली होती मागणी** – मध्य रेल्वेच्या स्थानकांची इंग्रजी नावे बदलण्याची मागणी शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी सर्वप्रथम केली होती. राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार जाऊन महायुतीचे सरकार स्थानापन्न झाल्यानंतर गेल्या वर्षी तत्कालीन खासदार राहुल शेवाळे यांनी पुन्हा ही मागणी लावून धरली. त्यानंतर राज्यविधीमंडळात हा प्रस्ताव अखेर मंजूर झाला आहे.

## वरळी हिट अँड रन प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला अटक

**(पान १ वरून)** त्यानंतर तो फरार झाला. आता पोलिसांनी दोन दिवसांनंतर त्याला शहापूरमधून अटक केली आहे. मिहीर शाहाची वैद्यकीय चाचणी केली जाणार आहे.

अपघात झाल्यानंतर फरार झालेल्या मिहीर शाहाच्या मागावर मुंबई पोलिसांच्या आठ टीम होत्या. पोलिसांनी मिहीर शाह आणि त्याला मदत करणाऱ्या इतर १२ जणांना अटक केली आहे. मिहीर शाहने अपघातावेळी मद्यपान केलं होतं का, अपघातावेळी नेमकं काय घडलं याबद्दल अधिकची माहिती आता पोलिस घेतील.

या आधी पोलिसांनी मिहीर शाहाच्या मैत्रिणीचा जबाब नोंदवला होता. तसेच आरोपीचे वडील राजेश शाह आणि ड्रायव्हर राजऋषी सिंहला पोलिसांनी अटक केली होती. पण राजेश शाहाला जामीन मिळाला आहे.

## अखेर त्या १४ गावांचा नवी मुंबई पालिकेत समावेश

**(पान १ वरून)** आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत. नवी मुंबई पालिकेच्या ४ अभियंत्यांना मूळ विभागाचे काम सांभाळून या १४ गावांचे अतिरिक्त कामकाज पाहायचे आहे. भंडार्ली, पिंपरी गाव, गोटेघर, बंबार्ली, उत्तरशिव, नागाव, नारिवली, वाकळण, बाळे आणि दहिसर मोरी. दहिसर, निघू, मोकाशीपाडा, नावाळी, या गावांचा यामध्ये समावेश आहे. १४ गावांच्या मालमत्ता हस्तांतरणाच्या कामाला ११ तारखेपासून होणार आहे. दरम्यान, याबाबतचे आदेश निघताच फटाके वाजवून जल्लोष करण्यात आला.

## पाण्यासाठी केडीएमसीच्या प्रभाग कार्यालयावर शिवसेनेचा हंडा मोर्चा

**(पान १ वरून)** पाण्यासाठी भटकंती करावी लागते. तर पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत जाते. याकडे केडीएमसी दुर्लक्ष करत आहे. दरम्यान आज पाण्याच्या समस्येसाठी ) शिवसेनेच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी केडीएमसीच्या अ प्रभाग कार्यालयावर हंडा मोर्चा काढला होता. मोर्चा दरम्यान शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते व नागरिक महापालिका कार्यालयाचे गेट उघडून थेट आत घुसले. अधिकाऱ्याच्या दालनात गोंधळ घालत अधिकाऱ्यांना पाणी टंचाई बाबत जाब विचारला. यावेळी अधिकाऱ्यांनी या भागातील पाणी टंचाईवर दोन दिवसात मार्ग काढण्यात येईल; असं आश्वासन आंदोलनकर्त्यांना दिले आहे.

## बनावट सीमद्वारे शिवीगाळ करून धमकावणाऱ्या टेली कॉल सेंटरचा पर्दाफाश

**(पान १ वरून)** याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यामध्ये दोन जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाच्या तपासात खंडणी विरोधी पथकाने ३ जुलै, २०२४ रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास दोघांसह सिम विक्री करणाऱ्या अशा तिघांना अटक केली. त्यांना ठाणे न्यायालयात नेले असता बुधवार(१० जुलै) पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

अनेकांना अश्लील शिवीगाळ केल्याप्रकरणी २ जुलै रोजी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच प्रकरणात मोबाईल सिमकार्ड नावावर असलेल्या मंगेश हरेश सुतारे(३४) रा. गोमा गल्ली, सुतारे हाऊस, रामले मार्ग, अंधेरी वर्सोवा, हे व्यवसायाने कोळी आहेत. त्यांची चौकशी केल्यानंतर त्यांनी सांगितले अशा प्रकारचा कुठलाच नंबर आपण घेतला नसल्याचे सांगितले. त्यानंतर सुतारे यांनी दिलेल्या माहिती आणि पोलीस पथकाने केलेल्या तांत्रिक अभ्यासाद्वारे पोलिसांनी वायरलेस कनेक्ट, मिनी स्टोअर्स, यारी रोड, अंधेरी पश्चिम येथील व्हीआय कंपनीचा प्रतिनिधी राहुलकुमार टिळकधारी दुबे(३३) रा. रूम नं ४०१, सी ६, एच. डी. आय. एल. बिल्डीग विरार पुर्व याची कसून चौकशी केल्यानंतर त्याने कंपनीने दिलेले टार्गेट पुर्ण करण्याकरीता त्याचेकडे येणा–या ग्राहकांची फसवणुक करून त्यांचे नावावर दोन ते तीन सिमकार्ड काढून त्यापैकी एक सिमकार्ड ग्राहकाला देवुन उरलेली सिमकार्ड त्याने लोन रिकव्हरी टेली कॉल सेंटर सिटीझन कॅपीटल १०१, स्टार मनोर, को. ऑफ हौसिग सोसायटी, कॅबीन क्रॉस रोड, भांयदर पुर्व याना दिले असल्याचे सांगितले. त्याला ३ जुलै रोजी खंडणी विरोधी पथकाने अटक केली. त्याच रात्री लोन रिकव्हरी सेंटर असलेल्या १०१, स्टार मनोर, को. ऑफ हौसिग सोसायटी, कॅबीन क्रॉस रोड, भांयदर पुर्व येथे छापेमारी केली. कॉल सेंटरमधून पोलिसांनी ३ जुलै रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास शुभम कालीचरण ओझा(२९) रा. ए. विंग, २०१, चंदन व्हॅली, शिवार गार्डनसमोर, मिरा भायदर रोड, मिरा रोड पुर्व, ठाणे, आणि अमित मंगला पाठक(३३) हा टेलीकॉलर आहे. रा. वनराई चाळ, रूम नंबर ०५, राथोडी, मिरा मेडीकलजवळ, मालाड पश्चिम या दोघांना अटक करण्यात आली. या दोघांनी कॉल सेंटर मधून लोन घेतलेले नसलेल्या इसमांना देखील अश्लील भाषेत शिवीगाळी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. कॉल सेंटर मधून पोलीस पथकाने कॉम्पुटरमधील ४ एस.एस.डी.हार्डडिस्क, १ जीएसएम गेटवे, १ टीपी लिंक कंपनीचा २४ पोर्ट स्विच, १ राऊटर, ३ मोबाईल असा ७७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. खंडणी विरोधी पथक याप्रकरणी अधिक तपास करीत आहे.

## सर्व प्रभारी पदावरील अधिकाऱ्यांना मूळ पदावर आणा

**(पान १ वरून)** परिणामी ठाणेकरांच्या करातून जमा झालेल्या पैशाचा अपव्यय होत असल्याने त्या प्रभारींना मूळ पदावर आणावे. अन्यथा, येत्या १५ ऑगस्ट रोजी आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहोत, असा इशारा शिंदे यांनी दिला.

### महापालिकेच्या इन्टीग्रेटेड कंट्रोल ॲण्ड कमांड सेंटरमध्ये

## महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी घेतली अधिकारी वर्गाची बैठक !

### आपत्कालीन परिस्थितीत त्वरेने व समन्वयाने काम करण्याचे दिले निर्देश !



कल्याण – महापालिका मुख्यालयातील इन्टीग्रेटेड कंट्रोल ॲन्ड कमांड सेंटरमध्ये (ICCC) काल, मंगळवारी महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी अधिकारी वर्गाची बैठक घेऊन तेथील कार्यपध्दतीची पाहणी केली आणि आपत्कालीन परिस्थितीत सर्व अधिकाऱ्यांनी त्वरेने आणि समन्वयाने काम करावे अशा सुचना त्यांनी यावेळी उपस्थित अधिकारी वर्गास दिल्या.

महापालिका क्षेत्रात होणारी संभाव्य अतिवृष्टी, सखल भागात साचणारे पावसाचे पाणी या अनुषंगाने उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ICCC मध्ये मुख्य नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आला असून पावसाळयातील आपत्कालीन परिस्थितीत ICCC हे महत्वाचे मुख्य नियंत्रण केंद्र राहील. यामध्ये महापालिका अधिकारी वर्गाच्या नियंत्रणाखाली एक पथक गठीत करण्यात आले असून या केंद्रामध्ये सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीसाठी नेमणूका केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी या केंद्रामधून प्राप्त होणारे संदेश संबंधित यंत्रणेकडे जलदगतीने पोहोचविण्याचे काम करावे, अशाही सुचना आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त – १ प्रल्हाद रोडे, अतिरिक्त आयुक्त – २ तथा नोडल अधिकारी आपत्ती व्यवस्थापन धैर्यशील जाधव, शहर अभियंता अनिता परदेशी तसेच इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.



■ भाईंदर पश्चिम येथील मुबारक बिल्डिंग समोरील रस्त्यावर भुयारी गटारावरचे खचलेले चेंबर रस्त्याच्या मधोमध असून, पादचाऱ्यांसाठी व वाहतुकीसाठी धोकादायक आहे. मात्र आज आठ दिवस झाले तरी याची दखल सदर ठिकाणापासून चालत पाच मिनिटे अंतरावर असलेल्या मिरा–भाईंदर महानगरपालिका मुख्यालयातील बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतलेली नाही.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२–२७४५२२३३ Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२९६/२९७/२०२४ दिनांक :– ०९/०७/२०२४

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

पनवेल महानगरपालिकेकरिता वेब बेस आधारित बजेट कंट्रोलींग सॉफ्टवेअरची निगा व दुरुस्ती करणेबाबत सदरकामी अंदाजपत्रक बनविणे करिता बाजारभाव मागविण्यात येत आहेत. तरी निविदाधारक यांनी नमूद कामाची दर हे अंदाजपत्रक बनविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागात विहित मुदतीत जमा करण्यात यावे. या कामसंबंधीचा सविस्तर तपशील माहिती व तंत्रज्ञान विभागात उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारक यांनी त्यांची नोंद घ्यावी.

मुदत :
पमपा/मातंवि/३०२४/प्र.क्र.९/३१४/२०२४
दिनांक : १०/०७/२०२४

सही/–
(कैलास गावडे)
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका


### ओला आणि सुका कचऱ्यांचे वर्गीकरण करण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहिम

## कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन

ठाणे – आपल्या परिसरातील व घरातील ओला आणि सुका कचरा योग्य प्रकारे वर्गीकृत करण्यासाठी जिल्हयात सोमवार, दिनांक ८ जुलै २०२४ पासून विशेष मोहिम राबवण्यात येत आहे. या कालावधीत विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत, त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक गावात स्वच्छतेचे दोन रंग, ओला हिरवा, सुका निळा या नावाने अभियान राबवण्यात येणार आहे. स्वच्छतेचे दोन रंग, ओला हिरवा, सुका निळा अभियान राबवण्यात येत असून ओला व सुका कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे तसेच प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन अतुल पारसकर यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा–२ अंतर्गत डिसेंबर २०२४ पर्यंत ठाणे जिल्हा (ग्रा) हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रत्येक गावात ५ संवादकाची निवड करण्यात येणार असून हे संवादक गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. यासाठी सरपंच, उपसरंपच, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा समावेश आहे. तालुक्यातील गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील गावांचे प्रती कुटूंब पाच या प्रमाणे संवादक तयार करून गृहभेटीचे आयोजन तसेच तालुक्यातील सर्व अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी संनियंत्रण करून अंमलबजावणी करत आहेत. ओला कचरा हिरव्या रंगाच्या डब्यात ठेवावा तसेच सुका कचरा निळ्या रंगाच्या डब्यात ठेवण्यासंदर्भात तसेच नियमित शौचालयाचा वापर करणे, शास्त्रयुक्त पध्दतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, सुयोग्य मैला गाळ व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय व त्याचा नियमित वापर आदि बाबत गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. भेटी दरम्यान शासनाच्या गुगल लिंकव्दारे कुटुंबांची फोटोसह माहिती भरण्यात येणार आहे.






सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे
मजला क्र. ३ ते ६, वेस्ट व्ह्यू इमारत,
राम मारूती रोड, गजानन महाराज
मंदिराजवळ, ठाणे (प)–४००६०२.

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे**

**जाहीर नोटीस**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२–नियम ७ व ७ अे वाचावे)

बदल अहवाल क्रमांक : ACC I / ८८८/२०२४ TO ८९५/२०२४

ज्याअर्थी, **उज्वल प्रबोधिनी संस्था, बदलापूर** या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त **श्री. किसन गणपत चौधरी** यांनी **कार्यकारी मंडळ** यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक **०१/०७/२०२४** रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक १२/०८/२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९ रोजी माहे ०७ सन २०२४ माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे



**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**वालीव नाका, वसई (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०८**

मुख्य कार्यालय : विरार (पूर्व)
दूरध्वनी : ०२५०–२५२५१०१/०२/०३/०५/०६
फॅक्स : ०२५०–२५२५१०७
जा. क्र. : वविशम/८८८/२०२४–२५
दिनांक : ०९/०७/२०२४

**जाहीर नोटीस**

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतर कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसाच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत / तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेस विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | गोखिवरे | GK०३/१३८५०/६४ | निकॉन इन्फ्रा एल एल पी | मनोज शंकर परदेशी व सीता म परदेशी |
| २. | गोखिवरे | GK०३/१३८५०/६६ | निकॉन इन्फ्रा एल एल पी | शितल श्रीकृष्णा डांगे व श्रीकृष्णा तु डांगे |
| ३. | गोखिवरे | GK०३/१३७५३/८० | ग्लोबल होम मेकर्स | सरीता अजय गुप्ता |
| ४. | गोखिवरें | GK०१/७७२६/७ | रुपेश आर मालोदे | रोहिणी शशिकांत पाटील |
| ५. | गोखिवरे | GK१०/२६३ | संजय रामचंद्र पाटील व भालचंद्र दामोदर पाटील | संजय रामचंद्र पाटील व राजेंद्र भालचंद्र पाटील व रविंद्र भालचंद्र पाटील |
| ६. | गोखिवरे | GK१०/२२७१ | विजय रामचंद्र पाटील | रविंद्र भालचंद्र पाटील व राजेंद्र भालचंद्र पाटील व संजय रामचंद्र पाटील |
| ७. | गोखिवरे | GK१०/११९० | विजय रामचंद्र पाटील | रविंद्र भाऊ पाटील व केतन विजय पाटील ऋषिकेश रामचंद्र पाटील |
| ८. | गोखिवरे | GK०४/१३६०८/३८ | एस एस बिल्डर्स् | पोल फिलीप जोसफ व स्वर्ण पोल जोसफ |
| ९. | गोखिवरे | GK०६/२०६४/१ | टी आर अलकुंटे | अमा अमृत अलकंटे |
| १०. | गोखिवरे | GK०६/१०६८८ | मो मौला रुकमुद्रदीन शेख व रिजवाना मोहम्मद मौला शेख | रघुनाथ रामहरख खरवार |
| ११ | गोखिवरे | GK०६/७८८८/२८ | साई सहारा डेव्हलपर्स व संजय साहबल यादव | संजय के विश्वकर्मा व श्रवण के विश्वकर्मा |
| १२ | गोखिवरे | GK०६/१३५९४ | प्रदिप महादेव महाडिक | प्रतिक्षा प्रदिप महाडिक |
| १३ | गोखिवरे | GK०१/२२०१/२ | महम्मद हलीत नियाती | मो. हलीम कल्लु नियाजी विभागणी (२१९ चौ.फुट) व मो. आदील नियाजी विभागणी (२१९ चौ.फुट) |
| १४ | गोखिवरे | GK०३/१३७१६/८८ | चिराग गिरीश चितालिया | अन्नाम्मा थोमस व थोमस पी जे |
| १५ | गोखिवरे | GK०३/१३५९५/१० | निकॉन इन्फ्रा एल एल पी | श्रीनिवासन सेल्वराज कृष्णन |
| १६ | गोखिवरे | GK०६/१०६६७/२९ | पुनम एम घोन्सालविस | राणू रणजित पटेल |
| १७ | गोखिवरे | GK०६/१०६६७/३७ | टी सरवणन | रामपाल जी पाल व सचिन राम पाल |
| १८ | गोखिवरे | GK०५/१११७०/४६ | चैताली केकीन मारु | हरीशंकर टि मौर्या व फुलकली ह मौर्या |
| १९ | गोखिवरे | GK०८/७६०४/१ | बबलु प्रसाद कनोजिया | बबलु प्रसाद कनोजिया व सीतारादेवी व.प्र. कनोजिया |
| २० | गोखिवरे | GK०८/७६०४ | बबलु प्रसाद कनोजिया | बबलु प्रसाद कनोजिया व सीतारादेवी व.प्र. कनोजिया |

सही/–
सहा. आयुक्त प्रभाग समिती 'जी'
वसई विरार शहर महानगरपालिका

## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/ MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/ PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

■ जागा : १५८
■ पदाचे नाव तपशील:
१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८
■ शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: भंडारा
■ फी : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाइट https://ddpdoo.gov.in/units/OFBA

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/ इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/




■ जागा : १५२
■ पदाचे नाव तपशील:
१ विद्याशाखांचे डीन
२ प्राध्यापक
३ सहयोगी प्राध्यापक / उप ग्रंथपाल
४ सहयोगी प्राध्यापक / सहयोगी ग्रंथपाल
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) संबंधित विषयात Ph.D. /55% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) संबंधित विषयात Ph.D. (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: संबंधित विषयात Ph.D+५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+ पुस्तक ०७ प्रकाशने+ ०८ वर्षे अनुभव+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी + ०८ वर्षे अनुभव
पद क्र.४: ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: खुला प्रवर्ग: ५००/- मागासवर्गीय: २५०/-
■ भरलेले अर्ज सादर करण्याचा पत्ता: The Registrar, University of Mumbai, Room No. 25, Fort, Mumbai-400032
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२४
■ वेबसाईट https://mu.ac. in/

## महाराष्ट्र अग्निशमन सेवा

■ उपलब्ध पाठ्यक्रम (कोर्स):
अ. क्र. कोर्सचे नाव पद संख्या कालावधी
१ अग्निशामक (फायरमन) कोर्स - ०६ महिने
२ उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी कोर्स ४० ०१ वर्षे
■ शैक्षणिक पात्रता:
अग्निशामक (फायरमन): ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/ EWS: ४५%गुण
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: ५०% गुणांसह पदवीधर SC/ST/NT/VJNT/SBC/ OBC/EWS: ४५%गुण
■ शारीरिक पात्रता:
कोर्सचे नाव उंची वजन छाती
अग्निशामक (फायरमन) १६५ सें.मी. ५० ज्ञस ८१/८६ सें.मी
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी १६५ सें.मी. ५० ज्ञस ८१/८६ सें.मी
■ वयाची अट: १५ जून २०२४ रोजी, SC/ ST: ०५ वर्षे सूट, OBC/EWS: ०३ वर्षे सूट
अग्निशामक (फायरमन): १८ ते २३ वर्षे
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: १८ ते २५ वर्षे
■फी : कोर्सचे नाव खुला प्रवर्ग राखीव प्रवर्ग
अग्निशामक (फायरमन) ६००/- ५००/-
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी ७५०/- ६००
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी: २३ सप्टेंबर २०२४ पासून
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://mahafireservice.gov.in/

## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. झहूीळली रपव चरींहशारींळली. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

# दररोज टरबुजाचा रस प्यायल्यास तुमच्या शरीरावर काय होईल परिणाम?

### उन्हाळ्यात टरबूजाचा रस पिण्याचे फायदे

उन्हाळ्यात भरपूर प्रमाणात आणि जवळपास सगळीकडेच अगदी स्वस्तात मिळणारं फळ म्हणजे टरबूज. आंब्यापेक्षाही टरबूज आवडीने खाणारे अनेक लोक आहेत. उन्हाळ्यात आढळणारे टरबूज हे अनेक पौष्टिक घटकांनी समृद्ध एक चवदार व आरोग्यदायी असे फळ आहे. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही. उन्हाळ्यात शरीराला थंड आणि हायड्रेटेड ठेवण्यासाठी टरबूज हे खूप चांगले फळ मानले जाते. त्यात पोटॅशियम, राइबोफ्लेविन, लोह, कॅल्शियम, झिंक, फायबर, नियासिन, लोह, अ, ब, क ही जीवनसत्त्वे आणि लाइकोपिन असे अनेक प्रकारचे पोषक घटक असतात; जे शरीराला तंदुरुस्त ठेवण्याचे काम करतात.

कलिंगडामध्ये भरपूर पाणी असते आणि त्यामुळे ते शरीराला कधीही पाण्याची कमतरता भासू देत नाही. कलिंगडामध्ये क जीवनसत्त्व आढळते; जे मजबूत प्रतिकारशक्तीसाठी खूप महत्त्वाचे आहे. त्याशिवाय त्यात अ जीवनसत्त्वदेखील आढळते; जे रोगप्रतिकार शक्ती नियंत्रित करते आणि संक्रमणापासून संरक्षण करते. टरबुजाचे सेवन तुम्ही ज्यूसच्या स्वरूपातही करू शकता. पण, तुम्ही उन्हाळ्यात दररोज टरबुजाचा रस प्यायल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल, या विषयावर बंजारा हिल्स येथील केअर हॉस्पिटल्सच्या क्लिनिकल डाएटिशियन जी. सुषमा यांनी माहिती दिल्याचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबाबत जाणून घेऊ.

### टरबुजाचा रस प्यायल्यास तुमच्या शरीरावर काय होईल परिणाम?

१. अनेक वेळा उन्हाळ्यात शरीरात ऊर्जेची कमतरता जाणवते. जीवनसत्त्वांचा उत्कृष्ट स्रोत असल्याने टरबुजाचा रस ऊर्जा वाढवतो. त्यात असलेले जीवनसत्त्व ब६ आणि मॅग्नेशियममध्ये डोपामाइन असते, जे ऊर्जा पेशींना इंधन पुरवते. त्याव्यतिरिक्त बीटा कॅरोटीन आणि क जीवनसत्त्व ऊर्जा बूस्टर म्हणून कार्य करतात. एक ग्लास टरबुजाचा रस प्यायल्याने अशक्तपणा आणि थकवा दूर होतो.

२. उन्हाळ्यात अनेकदा कोवळ्या उन्हात फिरल्याने उष्माघात आणि सनस्ट्रोकचा धोका वाढतो. अतिउष्णतेमध्ये शरीराचे तापमान अनेक वेळा वाढते; जे वेळेवर थंड न केल्यास समस्या उद्भवू शकतात. अशावेळी टरबुजाचा रस बाटलीत सोबत ठेवणे चांगले. जेव्हाही तहान लागेल तेव्हा तो प्या. टरबुजामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने टरबुजाचा रस शरीरात निर्जलीकरण होऊ देत नाही आणि आपल्याला आतून थंड ठेवतो. त्यामुळे तहान तर शमतेच; पण थकवाही दूर होतो.

३. टरबुजाचा रस प्यायल्याने किडनी स्टोनचा त्रास होत नाही. हा रस नैसर्गिक लघवीचे प्रमाण वाढवितो; जो किडनीसाठी वरदान आहे. हा रस तुमचे यकृत शुद्ध करतो आणि मूत्रपिंडांना विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करतो. तसेच किडनीमध्ये दगड तयार होण्याला प्रतिबंध करतो.

४. टरबुजाचा रस तुम्हाला डोळ्यांच्या अनेक समस्यांपासून वाचवू शकतो. त्यामध्ये असलेले बीटा कॅरोटीन आणि अ जीवनसत्त्व दृष्टी सुधारण्यास मदत करते. लायकोपिन रेटिनाचे संरक्षण करते. मॅक्युलर डिजनरेशन, रातांधळेपणा, वयाशी संबंधित डोळ्यांचे त्रास यांसारख्या समस्या टाळण्यासाठी टरबुजाचा रस खूप प्रभावी आहे. त्याशिवाय या रसाच्या सेवनाने उन्हाळ्यात डोळ्यांच्या संसर्गापासून बचाव होतो.

५. जर तुम्हाला उच्च रक्तदाब असेल, तर टरबुजाचा रस प्यायल्याने तो सामान्य राहण्यास मदत होते. त्यामध्ये असलेल्या अमिनो सिड, मॅग्नेशियम व पोटॅशियम या घटकांमुळे रक्तवाहिन्या निरोगी राहतात आणि त्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होतो. रक्तदाबाच्या रुग्णांना टरबुजाचा रस पिण्याचा सल्लाही तज्ज्ञ देतात.

६. जर तुम्हाला तुमचे हृदय निरोगी आणि रोगमुक्त ठेवायचे असेल, तर टरबुजाचा रस प्या. टरबुजामध्ये असलेले पोटॅशियम हृदयविकारापासून बचाव करते. अमिनो ॲसिडमुळे रक्ताभिसरण सुधारते, तर बीटा-कॅरोटीन व लायकोपिन हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य चांगले राखतात. हृदयाशी संबंधित समस्यांपासून तुमचे रक्षण होते.

टरबुजाचा रस कोणत्याही वेळी ताजेतवाने करणारा पदार्थ असला तरी तज्ज्ञांनी सुचवले की, सकाळी किंवा दुपारी आदर्शपणे सकाळी १० ते १२ या वेळेत त्याचा आनंद घ्यावा. ही वेळ हायड्रेशन आणि पोषक द्रव्यांचे शोषण इष्टतम करते.


### टरबुजाचा रस कोणी टाळावा

टरबुजाचा रस साधारणपणे सुरक्षित असला तरी प्रत्येकासाठी तो योग्य नसतो. टरबुजामध्ये ऋज्ञऊच्-झी (शर्करा ज्यामुळे फुगणे, गॅस व क्रॅम्पिंग यांसारखा पचनाचा त्रास होऊ शकतो) इरिटेबल बोवेल सिंड्रोम किंवा संवेदनशील पचन असलेल्या लोकांनी सावध राहिले पाहिजे. टरबुजाच्या रसातील नैसर्गिक साखरेमुळे रक्तातील साखर वाढू शकते. आपल्या उन्हाळ्याच्या दिनचर्येमध्ये दररोज टरबुजाचा रस समाविष्ट करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. तुमच्या वैयक्तिक आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन, ते तुम्हाला योग्य प्रमाणात सल्ला देऊ शकतात, असे सुषमा म्हणाल्या.



# गौतम गंभीरची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड

भारतीय क्रिकेट संघाने नुकतीच टी-२० विश्वचषकात विजय मिळविल्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर बीसीसीआय मुख्य प्रशिक्षकपदाच्या शोधात होती. भारताचा माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर या पदासाठी इच्छुक होता. त्यासाठी त्याने मुलाखतही दिली होती. आता बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी गौतम गंभीरची मुख्य प्रशिक्षकपदी निवड झाल्याचे जाहीर केले आहे. गौतम गंभीरचा कार्यकाळ जुलै २०२४ पासून सुरू होत आहे. तो डिसेंबर २०२७ पर्यंत या पदावर राहिल. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांकरिता प्रशिक्षकपदाची जबाबदारी त्याच्यावर राहणार आहे.




जय शाह यांनी एक्सवर पोस्ट करत ही बातमी दिली आहे. त्यात ते म्हणाले, भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षकपदासाठी माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर यांचे नाव जाहीर करताना मला आत्यंतिक आनंद होत आहे. आधुनिक काळातील क्रिकेट झपाट्याने बदलले आहे आणि गौतम या बदलांचा साक्षीदार राहिला आहे. गौतमने त्याच्या कारकिर्दीत अनेक भूमिका वठविल्या आहेत. त्याने आजवर केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तो यापुढे भारतीय संघालाही पुढे नेईल. तसेच हे करण्यासाठी तो आदर्श व्यक्ती वाटतो. गौतम गंभीरची दूरदृष्टी आणि त्याचा अफाट अनुभव त्याला मुख्य प्रशिक्षकपदासाठी योग्य दावेदार ठरवतो. बीसीसीआयकडून गौतम गंभीरच्या या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा, अशा शब्दांत जय शाह यांनी गौतम गंभीरचे स्वागत केले आहे.

बीसीसीआयच्या घोषणेनंतर गौतम गंभीरनेही एक्सवर पोस्ट टाकून या निर्णयाबद्दल पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

भारत ही माझी ओळख आहे आणि देशाची सेवा करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा अभिमानाचा क्षण आहे. भलेही माझ्या डोक्यावर वेगळी टोपी असेल, पण मी आता भारतीय संघाचा पुन्हा एकदा भाग झालो, याचा आनंद वाटतोय. प्रत्येक भारतीय नागरिकाला अभिमान वाटेल, असे काम करणे, हेच यापुढेही माझे ध्येय असेल. निळ्या जर्सीतील खेळाडू १४० कोटी जनतेचे स्वप्न आपल्या खांद्यावर घेतात. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला जे काही करता येईल, ते करण्याचा मी प्रयत्न करेन, अशी भावना गौतम गंभीरने व्यक्त केली आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये भारतीय संघाचा एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाला. या पराभवानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती घेण्याची इच्छा जाहीर केली होती. मात्र कर्णधार रोहित शर्माच्या विनंतीनंतर त्यांनी टी-२० विश्वचषकापर्यंत प्रशिक्षक पदावर राहण्याचे मान्य केले. २९ जून रोजी बार्बाडोसच्या मैदानावर भारतीय क्रिकेट संघाने तब्बल ११ वर्षानंतर आयसीसी चषक जिंकत मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडला एक उत्तम भेट दिली.

### बीसीसीआयने नव्या प्रशिक्षकपदासाठी घातल्या कठोर अटी

किमान ३० कसोटी सामने किंवा ५० एकदिवसीय सामन्यांचा अनुभव.
किंवा किमान दोन वर्षे पूर्ण वेळ कसोटी खेळणाऱ्या देशाचा मुख्य प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
किंवा कोणत्याही असोसिएट सदस्य संघाचा/कोणत्याही आयपीएल संघाचा किंवा अशा कोणत्याही लीग किंवा प्रथम श्रेणी संघाचा किंवा कोणत्याही
देशाच्या अ संघाचा तीन वर्षे प्रशिक्षक असण्यचा अनुभव.
किंवा बीसीसीआयचे लेव्हल-३ कोचिंग प्रमाणपत्र धारक असले पाहिजे.
वय ६० वर्षांपेक्षा कमी असावे.

# मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेचा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**नवी मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण ही योजना सुरु करण्यात आलेली असून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांत नोंदणी कक्ष सुरू करण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने योजनेची कार्यवाही सुनियोजित पध्दतीने व गतीमान रितीने व्हावी याकरिता संबंधित अधिकारी, कर्मचारीवृंदाचे विशेष प्रशिक्षण नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित करण्यात आले होते.**



याप्रसंगी समाजविकास विभागाचे उपआयुक्त आणि या योजनेचे मुख्यालय स्तरावरील नोडल अधिकारी श्री.किसनराव पलांडे यांनी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने या योजनेचे महत्व विशद करीत महानगरपालिका क्षेत्रातील एकही पात्र महिला या योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहू नये अशाप्रकारे आपल्याला काम करायचे आहे असे स्पष्ट केले. या योजनेची माहिती महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी विविध प्रचार व प्रसार माध्यमांचा प्रभावी उपयोग करणे व लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अर्ज दाखल करण्यापासून सर्वोतोपरी मदत करणे हे उद्दीष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात दरमहा रु.१५००/- इतकी रक्कम डिबीटी व्दारे प्राप्त होणार असल्याची माहिती देत शासनाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीम.ज्योती पाटील यांनी या योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या, निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला यांना घेता येईल असे सांगितले. याकरिता ती महिला महाराष्ट्र राज्याची रहिवासी असणे आवश्यक असून तिचे वय किमान २१ वर्ष व कमाल ६५ वर्ष असणे आवश्यक आहे. लाभार्थी महिलेचे स्वत:चे आधार लिंक असलेले बँक खाते असणे आवश्यक असून लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५ लाखापेक्षा जास्त नसावे अशी माहिती यावेळी देण्यात आली.

मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ पात्र महिलांना सुलभतेने घेता यावा याकरिता आवश्यक कागदपत्रेही महिलांना सहज उपलब्ध होतील अशी ठेवण्यात आलेली असून यामध्ये आधार कार्ड तसेच अधिवास प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला सादर करावयाचा आहे. अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड / मतदार ओळखपत्र / जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास तिने पतीचे जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. याशिवाय रु. २.५ लाखापर्यंतचे उत्पन्न प्रमाणपत्र अथवा पिवळे / केशरी रेशनकार्ड सादर करावयाचे आहे. त्याचप्रमाणे अर्जदाराचे हमीपत्र सादर करावयाचे असून आधार लिंक असलेले बँक पासबुकही सादर करावयाचे आहे. तसेच अर्जदाराचा फोटो अपलोड करावयाचा असून स्वत: लाभार्थी महिला उपस्थित असणे आवश्यक असणार आहे.

अशी विविध प्रकारची उपयुक्त माहिती प्रशिक्षण कार्यक्रमात देण्यात आली व जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेची माहिती पोहचवून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही अशाप्रकारे काम करण्याचे सूचित करण्यात आले. समाजविकास विभागाचे सहा. आयुक्त प्रबोधन मवाडे यांनी आभार मानले.

# विघ्नहर्ता ट्रस्टच्या सचिवांवर गुन्हा दाखल

## गंभीर गुन्ह्यातील आरोपींना शेतघरात आश्रय दिल्याचा ठपका

कल्याण : उल्हासनगर येथे एका नागरिकाला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणातील पाच आरोपींना आपल्या माळशेज घाट भागातील करंजाळे येथील शेतघरात आश्रय दिल्याच्या आरोपातून उल्हासनगर पोलिसांनी डोंबिवलीतील विघ्नहर्ता ट्रस्टच्या सचीव आणि शेतघराच्या मालकीण गीता खरे यांच्यासह चार जणांवर मंगळवारी गुन्हा दाखल केला.रुतिक उर्फ अटल अनिल शुक्ला (रा. म्हारळ, उल्हासनगर), गोपाळ सत्यवान पाटील (रा. म्हारळ), सुमीत सत्यवान सैनी (रा. योगीधाम, कल्याण), शेतघराचे व्यवस्थापक प्रतीक जनार्दन ठाकरे (रा. कल्याण) आणि शेतघराच्या मालकीण गीता खरे अशी आरोपींची नावे आहेत. उल्हासनगर पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक सचीन बबनराव पत्रे यांनी हा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी सांगितले, उल्हासनगर पोलीस ठाणे हद्दीत एका नागरिकाला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न तीन ते चार जणांनी केला होता. या प्रकरणातील आरोपी गुन्हा करून फरार झाले होते. उल्हासनगर पोलीस शोध घेत होते. या गंभीर गुन्ह्यातील आरोपी माळशेज घाटातील ओतुर पोलीस ठाणे हद्दीतील करंजाळे शेतघरात लपून बसले असल्याची माहिती मिळाली. साहाय्यक पोलीस निरीक्षक पत्रे, उपनिरीक्षक समाधान हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक पोलीस पथक करंजाळे येथे पोहचले.

रात्रीच्या वेळेत ओतुर पोलिसांच्या साथीने उल्हासनगर पोलिसांनी शेतघरावर छापा टाकला. तेथे १५ जण होते. सहा इसम पोलिसांना पाहून पळून गेले. शेतघराचे व्यवस्थापक प्रतीक ठाकरे यांना पोलिसांनी




या शेतघरात आरोपींची नावे वाचून दाखवून ते येथे राहतात का म्हणून विचारणा केली. प्रतीकने अटल शुक्ला याच्या सूचनेवरून सोहन पवार, धीरज रोहेरा, यश पवार येथे राहत आहेत असे सांगितले. हेच गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी असल्याची खात्री पटल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन उल्हासनगर येथे आणून अटक केली.

अटल शुक्ला याने शेतघराचा व्यवस्थापक प्रतीक ठाकरे यांना येथे राहणारे तीन लोक हे उल्हासनगर मधील गंभीर गुन्हयातील आरोपी आहेत. त्यांची राहणे, भोजनाची व्यवस्था कर, अशी सूचना केली होती. त्यामुळे तिघांना या शेतघरात आश्रय मिळाला होता, असे पोलीस तपासात उघड झाले. अटल शुक्लाला गोपाळ सत्यवान पाटील (रा. म्हारळ) याने शेतघराचा संदर्भ दिला होता. तीन जण गंभीर गुन्ह्यातील आरोपी आहेत हे माहिती असुनही त्यांची माहिती पोलिसांपासून लपवली आणि गन्हेगारांना शेतघरात आश्रय देण्यासाठी पुढाकार घेतला म्हणून पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

# कल्याण डोंबिवली पालिकेत जन्म–मृत्यू दाखले मिळण्यास विलंब

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या जन्म, मृत्यू दाखले ऑनलाईन माध्यमातून देण्याच्या कार्य प्रणालीमध्ये शासन निर्देशानुसार बदल केले जात आहेत. या बदलाच्या कार्य प्रणालीची अंमलबजावणी सुरू होईपर्यंत पालिकेकडून देण्यात येणारे जन्म, मृत्युचे दाखले विलंबाने मिळू शकतात. नागरिकांनी याकामी सहकार्य करण्याचे आवाहन पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी केले आहे.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या जन्म, मृत्यू नोंदणी विभागात सध्या कार्यरत असलेल्या सीआरएस प्रणालीमध्ये बदल करण्यात आला आहे. ही प्रणाली प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यासाठी थोडा विलंब होत आहे. त्यामुळे पालिकेकडून देण्यात येणाऱ्या जन्म, मृत्यू दाखले देण्यात थोडा विलंब होऊ शकतो, अशी माहिती डॉ. शुक्ल यांनी दिली आहे.

केंद्र शासनाच्या सुधारित प्रणालीप्रमाणे एक वर्षापूर्वी नोंदणी न केलेल्या घटनांसाठी न्यायालयाच्या आदेशाऐवजी तहसीलदार यांचे लिखित आदेश आता प्रमाणित केले जाणार आहेत. सीआरएस प्रणाली शिवाय अन्य कोणत्याही मार्गाने नियमबाह्य पध्दतीने जन्म, मृत्यू घटनांची नोंदणी करण्यात येऊ नये अथवा ठेवण्यात येऊ नये असे शासनाचे निर्देश आहेत.

खासगी रुग्णालयांनी करावयाची करावयाची नोंदणी, पालिकेला द्यावयाची माहिती, विविध प्रकारच्या दुरुस्ती तसेच शुल्क आकारणी इत्यादी संदर्भात महापालिका क्षेत्रातील खासगी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना पालिकेच्या जन्म, मृत्यू विभागातर्फे प्रशिक्षण देण्यात येऊन आणि मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकेची जन्म, मृत्यू विभागातील नोंदणी विलंबाने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे दोन्ही दाखले मिळण्यास विलंब होण्याची शक्यता नाकारत येत नाही, असे डॉ. शुक्ल यांनी म्हटले आहे.

# मुसळधार पावसात कल्याण–डोंबिवलीत तीव्र पाणी टंचाई

कल्याण : मुसळधार पाऊस सुरू असताना कल्याण, डोंबिवली शहरांच्या अनेक भागात, एमआयडीसी परिसरात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. मुबलक पाणी पुरवठा नागरिकांना करण्यात यावा, या मागणीसाठी रहिवासी मोर्चा, ठिय्या आंदोलन करून रस्त्यावर उतरले आहेत. हा सगळा कृत्रिम पाणी टंचाईचा प्रकार असून यामध्ये अधिकाऱ्यांची लबाडी असल्याची टीका कल्याण ग्रामीणचे मनसेचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी केली आहे. डोंबिवली जवळील गोळवली, दावडी, सोनारपाडा, मानपाडा, एमआयडीसीतील काही भाग, डोंबिवली जीमखाना परिसरातील वस्ती, आजदे, सागर्ली, गोळवली भागातील मध्यमवर्गियांची वस्ती असलेली नवीन गृहसंकुले, कल्याणमध्ये मोहने, आंबिवली, शहाड, अटाळी रेल्वे स्थानक परिसर, पाटीलनगर भागात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शहरात पाण्यासारखी गंभीर समस्या निर्माण झाली असताना कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन, एमआयडीसी प्रशासन पूर्णपणे ढेपाळले असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. कल्याण डोंबिवली पालिकेला भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकारी महिला लाभुनही त्यांचा प्रशासनावर वचक राहिला नसल्याने ही पाणी टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याची टीका संतप्त नागरिकांकडून केली जात आहे. एमआयडीसीचे अधिकारीही अंधेरी येथील त्यांच्या मुख्यालयातील बैठकांचे निमित्त करून कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. नागरिकांच्या पाणी टंचाईच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी कार्यालयात कोणी अधिकारी उपस्थित नसतात अशा तक्रारी नागरिकांनी केल्या.

# प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणे लोकअदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवा : न्या. ईश्वर सूर्यवंशी

ठाणे : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७ जुलै २०२४ रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत' चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोकअदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या २७ जुलै, २०२४ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्या. ईश्वर कां. सूर्यवंशी यांनी केले आहे.

आपापसात तडजोड करण्याजोगी फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद, कामगारांचे वाद, भूसंपादन प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलचे प्रकरणे, सेवा विषयक पगार, भत्ते व सेवा निवृत्तीचे फायदे-विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे, इतर दिवाणी प्रकरणे जसे

**जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये २७ जुलै रोजी होणार राष्ट्रीय लोकअदालत**

भाडे, वहिवाटीचे हक्क, मनाई हुकमाचे दावे, विशिष्ट पूर्व बंध कराराची पूर्तता विषयक वाद आदी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवता येणार असून त्याचप्रमाणे धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगारांचे वाद, कर वसुलीचे प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक या बद्दलची प्रकरणे आणि इतर आपसात तडजोड पात्र प्रकरणे, वैवाहिक व इतर दिवाणी वाद अशा प्रकारची दाखलपूर्व प्रकरणे या लोकअदालतमध्ये ठेवता येणार आहेत.

न्या. ईश्वर कां. सूर्यवंषी म्हणाले की, लोकअदालतीच्या निवाड्याविरुध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो. लोकअदालतीत होणारा निवाडा हा आपआपसात समजुतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोकअदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकअदालतीत होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते. वेळ, पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोकअदालतीत निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते. लोकअदालतचे महत्व लक्षात आल्याने २०२३ साली झालेल्या राष्ट्रीय लोकअदालत मध्ये ठाणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून राष्ट्रीय लोकअदालतचा लाभ अनेक पक्षकारांना मिळाला आहे.

तरी आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे लोकअदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा समिती प्राधिकरण यांच्या कार्यालयांशी संपर्क साधावा आणि लोकअदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत, असे आवाहन न्या. ईश्वर सूर्यवंशी यांनी केले आहे.

राजश्री शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त

# अंबरनाथमधील महात्मा गांधी विद्यालयात कार्यक्रम संपन्न

ठाणे : राज्यात राजश्री शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन संमेलन सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या सामजिक न्याय दिन संमेलन सप्ताह कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी (पुणे) यांच्या वतीने दि.५ जुलै २०२४ रोजी महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ येथे कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी महाविद्यालयाचे उप प्राचार्य ए. आर. कूसुंबे, पर्यवेक्षक राजेश रोहिदास, महाविद्यालयातील प्राध्यापक व इतर कर्मचारी, बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी मेघा पवार व सर्व समतादूत आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून श्री.गुरुनाथ देशमुख होते त्यांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराज यांच्या जीवन चरित्र या विषयावर सखोल मार्गदर्शन केले तसेच नशा मुक्ती व व्यसन यावर खूप मार्मिक कविता सादर करून विद्यार्थांना व्यसनापासून परावृत्त करण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा शेळके यांनी केले. समतादूत नितिन वाघमारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सामाजिक न्याय दिवस याबाबत थोडक्यात माहिती दिली. आभार प्रदर्शन जिल्हा प्रकल्प अधिकारी मेघा पवार यांनी केले.

ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने नमुंमपा कर्मचाऱ्यांना

# एनडीआरएफमार्फत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

ठाणे : जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे यांच्या वतीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी – कर्मचारी यांच्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात करण्यात आले होते.




याप्रसंगी बोलताना नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे प्रमुख तथा प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार यांनी कोणतीही आपत्ती सांगून येत नाही, त्यामुळे नेहमी सतर्क राहणे गरजेचे असून त्यादृष्टीने ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून या विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. कोणत्याही आपत्तीत एनडीआरएफ जवान ज्या समर्पित भावनेने नियोजनबध्द मदतकार्य करतात ते स्पृहनीय असल्याचे सांगत त्यांनी एनडीआरएफमार्फत आज मिळणारे प्रशिक्षण नवी मुंबईतील शहर आपत्ती व्यवस्थापनासाठी अत्यंत उपयोगी ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीम. अनिता जवंजाळ, यशदाचे मुख्य प्रशिक्षक योगेश परदेशी तसेच एनडीआरएफचे निरीक्षक जालिंदर फुंडे उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे यांच्या माध्यमातून एनडीआरएफच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा उपयोग नवी मुंबई महानगरपालिकेची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षमीकरणासाठी होणार आहे.

# निवृत्त अधिकाऱ्याच्या खात्यातून १ लाख ३५ हजार रुपये गायब

नवी मुंबई : आपल्या बँक खात्याची कुठलीही माहिती कोणालाही दिलेली नसताना तसेच ओटीपी येईल असा कुठलाही व्यवहार केला नसतानाही एका निवृत्त अधिकाऱ्याच्या बँक खात्यातील १ लाख ३५ हजार २१ रुपये अन्य अनोळखी व्यक्तीच्या खात्यात वळते झाले आहेत. या प्रकरणी एनआरआय पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत फसवणूक केली म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जॉईस अलेक्स असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. अलेक्स हे सी उड्स येथे राहत असून ८ तारखेला संध्याकाळी ७ वाजून ५२ मिनिटांनी त्यांना दोन संदेश आले त्यानुसार त्यांच्या बँक खात्यातून ९९ हजार ९९९ आणि ३५ हजार २२ रुपये दोन वेगवेगळ्या खात्यात वळते झाले होते. अलेक्स यांनी कोणालाही धनादेश दिले नव्हते वा बँक खात्याची माहिती दिली नव्हती तरीही अशी रक्कम संमती शिवाय अनोळखी खात्यात वळती झाल्याने याबाबत त्यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज केला. पोलिसांनीही या तक्रार अर्जाची दाखल घेत अनोळखी व्यक्ती विरोधात फसवणुकीचा गुन्हा आज (मंगळवारी) दाखल करण्यात आला आहे.



कळवा रुग्णालयात २१ नवजात बालकांची मृत्यू झाल्याची घटना समोर आल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेत हॉस्पिटलचे अधिष्ठातायांना जाब विचारला. यावेळी शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, शहरप्रमुख प्रदीप शिंदे आदींसह शिवसेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. (छाया : मनोज सिंह)

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तीकार संघटना, स्वयंसेवी संस्थाची मदत घ्या : आयुक्त सौरभ राव

शाळांमध्ये जागृती उपक्रमाचे आयोजन करण्याची केली सूचना

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तीकार संघटना, स्वयंसेवी संस्थाची मदत घ्यावी, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. या सगळ्यांच्या सहकार्याने हा उत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्याकडे आपण मार्गक्रमण करू शकतो, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.

राज्य सरकार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या निर्देशानुसार आपण पर्यावरणपूरक गणेशोत्सव नियमावली-२०२४ मार्च महिन्यात प्रसिद्ध केली आहे. सर्व मूर्तीकार, मूर्ती विक्रेते यांना त्यासंदर्भात माहिती दिली आहे. त्याबाबत पर्यावरण क्षेत्रातील संस्था व तज्ज्ञ आणि पारंपरिक मूर्तिकार संघटना यांच्याशी संवाद साधण्यात येत आहे. हे प्रयत्न असेच सुरू ठेवून जास्तीत जास्त संवाद साधला जावा, असे आयुक्त राव यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत स्पष्ट केले.

महापालिकेतील विभागप्रमुखांची आढावा बैठक सोमवारी सायंकाळी नागरी संशोधन केंद्र येथे झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्यासह सर्व उपायुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पर्यावरण विभागाने सक्रियपणे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी अधिकाधिक उपक्रम करावेत. महापालिकेच्या शाळा आणि इतर शाळांमध्ये एकाच दिवशी त्यासंदर्भात उपक्रमाचे आयोजन करावे. त्यात नाटिका, स्पर्धा, रांगोळी अशा कोणत्याही स्वरुपात विद्यार्थी आणि शिक्षक यांना व्यक्त होण्याची मोकळीक द्यावी. या उपक्रमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश घरोघरी जाईल. तसेच, भविष्यातील नागरिकांच्या मनात त्याविषयी आत्मियता निर्माण होईल. त्यादृष्टीने पर्यावरण विभाग, शिक्षण विभाग यांनी नियोजन करावे, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, गणेशोत्सव मंडळांची संघटना, मूर्तीकारांची संघटना यांना एकत्र आणून त्यातून हा उत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक होण्याच्या मार्गातील समस्या, अडचणी जाणून घ्याव्यात. म्हणजे त्यावर तोडगा काढता येईल, असेही आयुक्त राव म्हणाले.

## कांदळवनावरील भरावाबाबत आक्रमक व्हा

■ कोलशेत-बाळकूम परिसरातील मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिनीलगत कांदळवनावर भराव टाकण्यात आला आहे. या भागाची पाहणी केल्यानंतर तेथे मोठी वाहने जाऊ नयेत यासाठी चर खणण्यात आले आहेत. कांदळवनाच्या संवर्धनाबाबत फलक लावण्यात आले आहेत. मुंबई महापालिकेनेही मोठी वाहने या भागात प्रवेश करू नयेत याची उंच वाहन अवरोधक बसवले आहेत. आता हा भराव काढून टाकण्याची कारवाई ठाणे महापालिका करणार आहे. वन विभाग आणि महसूल विभाग यांच्याशीही येथील परिस्थितीबाबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

■ कांदळवनावरील हा भराव काढून टाकण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणेने आक्रमक व्हावे. आपल्या कृतीतून या संवेदनशील विषयाबाबत महापालिकेची आक्रमक भूमिका दिसली पाहिजे. त्यासाठी येत्या तीन दिवसात आतापर्यंत झालेली कारवाई आणि पुढील तीन महिन्यात करायचा कृती आराखडा सादर करावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी पर्यावरण आणि घनकचरा व्यवस्थापन विभागास दिले.

## स्वाईन फ्लूबद्दल सतर्क रहावे

ठाणे महापालिका क्षेत्रात, जूनपासून स्वाईन फ्लूच्या (एचवनएनवन) रुग्णांची संख्या ७० इतकी आहे. गतवर्षी या आजाराचे रुग्ण कमी होते, परंतु स्वाईन फ्लूच्या (एचथ्रीएनटू) रुग्णांची संख्या ८७ होती. ही संख्या लक्षात घेऊन आरोग्य विभागाने योग्य ती खबरदारी घ्यावी. औषधांची उपलब्धता ठेवावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात स्वाईन फ्लूच्या रुग्णासाठी स्वतंत्र आयसोलेशन वॉर्ड तयार केला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१